# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेस नोट ४१४-२०२४** **दिनांक-०८/११/२०२४**

## "गावठी हातभट्टीची दारु तयार करणा-या अड्ड्यावर छापा टाकुन लाखोचा मुद्देमाल नष्ट करण्यात गुन्हे शाखा कक्ष -२ वसई यांना यश."

-------///////-------

वसई पुर्व येथील कर्नाळापाडा खाडीलगत तिवराच्या झाडीमध्ये अज्ञात व्यक्ती अवैधरीत्या दारुच्या निर्मितीच्या भट्टया लावत असल्याची गोपनीय बातमीदाराकडुन माहीती मिळाल्याने सदर बातमीच्या अनुषंगाने कडक कारवाई करण्याबाबत मा. वरीष्ठांकडुन आदेश पारीत झाले. दि. ०७/११/२०२४ रोजी सकाळी ०७.०५ वा. चे सुमारास गुन्हे शाखा कक्ष -२ वसई कार्यालयाचे पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे स्टाफ तात्काळ रवाना होवून कर्नाळापाडा खाडीलगत तिवराच्या झाडी परिसरात छापा घालुन करण्यात आलेल्या कारवाई मध्ये १,६४,३००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल मिळुन आला त्यात १) ४००० लिटर नवसागर गुळ मिश्रीत वॉश. २) २० लिटर गावठी हातभट्टीची दारु व गावठी हातभट्टीची दारु तयार करण्याची साधने मिळुन आले असुन महिला आरोपीत विरुध्द पोशि/२३३०३ राजकुमार धनाजी गायकवाड नेमणुक - गुन्हे शाखा कक्ष-२ वसई यांनी सरकार तर्फे नायगाव पोलीस ठाणे येथे फिर्याद दिली असुन सदर बाबत विरार पोलीस ठाणे गुन्हा रजि नंबर ५४३/२०२४ महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम १९४९ चे कलम ६५ (ब), (क), (ड) व (फ)प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

उपरोक्त कामगिरी श्री. मधुकर पाण्डेय, पोलीस आयुक्त साो, श्री. दत्तात्रय शिंदे, अपर पोलीस आयुक्त साो, श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त साो (गुन्हे), श्री. मदन बल्लाळ सहा. पोलीस आयुक्त साो (गुन्हे) मि.भा.व.वि. पोलीस आयुक्तालय यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक/ शाहूराज रणवरे, पोउपनिरी/ अजित भास्कर गिते, पो.हवा./०५०३३ जगदीश गोवारी, पोहवा/ ०६१०७ रमेश आलदर, पोहवा/१२०९७ अमोल कोरे, पोशि/२३३०३ राजकुमार गायकवाड सर्व नेमणुक गुन्हे शाखा कक्ष-३ विरार यांनी पार पाडली आहे.

-------ooooo-------